# Greenlawns School - Worli

**Final Examination - 2016 -2017**

कक्षा :- सातवी | पूर्णांक :- 80

विषय :- मराठी (II<sup></sup>nd Session)

दिनांक :- 16.02.17 | समय :- 2 घण्टे

---

सूचना :- 1. सभी प्रश्न अनिवार्य हैं ।

2. शुद्ध भाषा एवं सुवाच्य लेखन अपेक्षित हैं ।

---

विभाग - अ

भाषा - विभाग (Marks - 40)

प्रश्न 1) खालीलपैकी एका विषयावर 15 – 20 ओळींचा निबंध लिहा :- (08)

i. आमचा देश

ii. श्रमांचे महत्त्व

iii. माझा आगगाडीचा प्रवास

प्रश्न 2) खालील दिलेल्या विषयावर पत्र लिहा :- (5)

' अभ्यास कसा महत्त्वाचा आहे ' हे लहान भावास पत्र लिहून कळवा.

प्रश्न 3) खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा :- (10)

डोंगरउतारावर शेतकऱ्यांची घरे होती. कापणीचा हंगाम होता. आईवडील शेतात कामाला गेले होते. लहान मुले झोपड्यांच्या आजूबाजूला नाचत बागडत होती. जंगलातून गावात जाणारी एक चिंचोळी पायवाट होती. एक लाहन मूल रस्त्याच्या मधोमध बसले होते. आजूबाजूला मुलं खेळत होती. जंगलातून एक बिथरलेला हत्ती पायवाटेने गावच्या दिशेने खाली येत होता. खेळणारी मुले घाबरली. आता हत्ती बाळाला पायाखाली तुडवणार असे त्यांना वाटले. परंतु हत्ती बाळाला पाहून क्षणभर थांबला. त्याने बाळाला सोंडेत उंच पकडले व तो चालू लागला. शेतातील मजुरांनी हत्तीच्या सोंडेतील रडणारे मूल पाहिले. परंतु बिथरलेल्या हत्तीपुढे जाणार कोणे ? कुठे सोंडेत पकडून आपटून टाकेल

नाहीतर पायाखाली तुडवून टाकेल ! सगळे लोक आरडाओरडा करत त्याच्यामागे धावू लागले.

हत्तीनेही चालण्याचा वेग वाढवला. मूल जोरजोराने रडू लागले. या बाळाचे आता काय होणार ? कोठे आपटणार तर नाही ना ? सर्व लोक हळहळत होते. बायाबापड्या हत्तीमागे धावत होत्या. परंतु हत्तीपुढे जाऊन त्याचा रस्ता अडवण्याची हिंमत कोणालाही नव्हती. आता या बाळाचे काय होणार ? सगळ्यांना काळजी वाटू लागली.

ही बातमी बाळाच्या आईला कळली मात्र , ती वाऱ्यासारखी समोरून धावत आली. ती आरडाओरडा करत होती. तिच्या डोळ्यातून घळघळा अश्रू वाहत होते. ती दु:खाने वेडी झाली होती. तिला आता कशाचीही भीती राहिली नव्हती.

आईने आपला पदर पसरला. ती हत्तीपुढे धावत आली. " अरे गजराजा, माझे बाळ मला परत दे ! हवे तर मला तुझ्या पायाखाली ठेच. पण माझ्या बाळाला माझ्या पदरात टाक ! " आणि आश्चर्याची गोष्ट , हत्ती थांबला. त्या मातेकडे त्याने नजर टाकली. त्याने आपली सोंड खाली आणली. बाळाला अलगद मातेच्या पदरात सोडले आणि डौलाने पुढे चालू लागला. आईला तिचे मूल मिळाले. तिने त्याचे पटापट मुके घेतले.

" हत्ती बुद्धिमान प्राणी आहे , असे म्हणतात ते खोटे नाही. त्याने बाळाच्या आईला बरोबर ओळखले. आईच्या धाडसामुळे मूल वाचले. " जमलेला जमाव बोलत होता.

प्रश्न :-

i. मूल कोठे बसले होते ? बाळाला पाहून हत्तीने काय केले ? (2)

ii. लोकांना कोणती काळजी वाटत होती ? (2)

iii. बाळाच्या आईची स्थिती कशी झाली होती ? (2)

iv. आईने गजराजाला कशाप्रकारे व कोणती विनंती केली ? (2)

v. वाक्य बनवा :- धाडस , बातमी (2)

## व्याकरण - विभाग

प्रश्न 4) अ) समानार्थी शब्द लिहा :- (2)

1. तक्रार 2. खुलासा

3. वस्ती 4. मिठी

आ) विरुद्धार्थी शब्द लिहा :- (2)

1. नम्र 2. श्रेष्ठ

3. सामोरी 4. फुलणे

इ) वचन बदला :- (2)

1. हालचाल 2. गाणी

3. जात 4. काटे

ई) लिंग बदला :- (2)

1. गुराखी 2. पेटी

3. चित्ता 4. वीर

उ) अशुद्ध शब्द शुद्ध करा :- (2)

1. नालत्सी 2. स्वाभीमानी

3. दयालू 4. भुमी

ऊ) शब्दसमूहांचे अर्थ लिहा :- (2)

1. कान देऊन ऐकणे 2. सज्ज ठेवणे

3. बदला घेणे 4. चहाडी करणे

क) खालील दिलेल्या वाक्यातील योग्य विरामचिन्हे लावून वाक्य पुन्हा लिहा :- (2)

1. राजेसाहेब म्हणाले कशाचे दर्शन आहे काय तिथे

2. ते म्हणाले गुरुदेव आम्हांला आशीर्वाद द्या

ख) खालील दिलेल्या वाक्यातील अव्यय ओळखून त्यांचे प्रकार लिहा :- (2)

1. देवा रे ! आता काय करायचं ?

2. सर्व कामे बंडूला करावी लागते त्यामुळे त्याला शाळेत जाणे अशक्य झाले.

ग) काळ ओळखा :- (1)

1. राजदरबारी मंडळी तक्रार नोंदवतात.
2. तू नक्कीच यशस्वी होशील.

## विभाग - ब

## साहित्य - विभाग (40 Marks)

प्रश्न 5) अ) खालील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :- (12)

i. दरबारातील काही जणांनी राजेसाहेबांकडे कोणती तक्रार केली ?
ii. झलकारीने चित्त्याला कसे ठार केले ?
iii. गुरुजींनी पहिल्या दोन शिष्यांना आश्रमातच राहण्यास का सांगितले ?
iv. दिवाणजी पेटीतील वस्तूंचे दर्शन कोणत्या उद्देशाने घेत असत ?

आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :- (4)

i. दिवाणजींमध्ये कोणते विशेष गुण होते ?
ii. आश्रमातील शिक्षण पूर्ण झाल्यानंतर शिष्य काय करत ?
iii. झलकारी राणीच्या दरबारात बुजल्यासारखी का वागत होती ?
iv. तहाची बोलणी करण्याकरता कोण व कसे गेले ?

इ) खालील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :- (4)

i. सर्व गाव हा .................. बघायला .................. धावला.
ii. तू .................. मी दिलेली .................. उजळ केली आहेस.
iii. मी .................. एक .................. काढण्याचा विचार करीत आहे.
iv. ती खोली सोडण्यापूर्वी .................. न विसरता .................. लावत.

ई) कोण, कोणास म्हणाले, ते लिहा. (3)

i. " तुम्ही उद्या घरी जा."

ii. " ब्रिटिश सरकार तुझा मानसन्मान करून मोठी रक्कम देणार आहे."

iii. " तेव्हा तुम्ही लढाई थांबवावी. "

उ) शब्दार्थ लिहा :- (3)

1. बेत 2. तट

3. सहीसलामत 4. दिवाणजी

5. तह

## पद्य - विभाग

प्रश्न 6) अ) *थोडक्यात उत्तरे लिहा :-

1. कवीने काय विचारू नका, असे म्हटले आहे ? (3)
2. कळीचा रुसवा घालवण्यासाठी धुक्याने काय केले ? (2)
3. मंगल धाम कशास म्हटले आहे ? (1)

आ) खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा व कवितेच्या कवीचे नाव लिहा. (4)

एकदा एक कळी......................

...............................................

...............................................

...............................................

...............................................

...............................................हसू नाही फुलले.

इ) रिकाम्या जागी कंसांतील योग्य शब्द लिहा :- (2)

1. एकच माळी या सर्वांचा, नाव .......... पुसू नका. ( त्याचे / तयाचे )
2. जात कोणती पुसू नका, ........... कोणता पुसू नका. ( पंथ / धर्म )
3. उद्यानातील फुलास त्याचा .......... कोणता पुसू नका. ( रंग / सुगंध )
4. डाव्या - उजव्या करांत काही, .......... मानूनी फसू नका. ( खेद / भेद )



उलटकर देखिए

ई) 'अ' गटातील दृश्ये व 'ब' गटातील त्यासाठी वापरलेली उपमा दिलेली आहे. त्यांच्या योग्य जोड्या जुळवा :- (2)

Teacher copy

| | 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|---|
| 1. | कळी पानाने झाकली जाणे | टिचकी |
| 2. | पानावरील दवाचे थेंब | घुंगट |
| 3. | सूर्याचे किरण | मोती |
| 4. | वाऱ्याचा कळीला स्पर्श | दूत |

---------------- समाप्त ----------------